# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर

**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**

स्टेशन रोड उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर-४३१००५ (महाराष्ट्र)

०२४०-२३३२६३५, २३२६४०५, २३५८३३३ फॅक्स :- ०२४०-२३२२८३५


---

जा.क्र.: शाअमऔछसं/परिक्षा विभाग/२०२४-२५/ 2626

दि. 21 AUG 2024

**नोटीस बोर्ड / संस्थेच्या संकेतस्थळा करिता** / स्थानिक वर्तमानपत्रे -२.

**विषय :- संस्थेतील जूनी रद्दी विकत घेणेबाबत निविदा मागविणे बाबत.**

वरील विषयी आपणास सूचीत करण्यात येते की, खालील अटीच्या राहून सरकार मान्य रद्दी खरेदीदारांकडून जास्तीत जास्त दराचे निविदा (Competitive Quotations) खालील प्रकारची रद्दी विकत घेणेकरिता मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. संस्थेतील विभागातील रद्दी विभागाच्या भांडार समितीसमोर संस्थेच्या डिजीटल काटयावरती मोजावी लागेल.

२. संस्थेतील विभागातील रद्दी ही वेगवेगळया विभागातून हस्तगत करावी लागेल.

३. सदर रद्दी गोपनीय स्वरुपाची असल्याने तात्काळ चार तुकडे करण्यात येवून नंतरच रद्दी गोणीमध्ये भरुन घेण्याची जबाबदारी आपली राहील व त्याकरिता लागणारे कोणतेही सामान, मोबदला देय राहणार नाही.

४. सदर रद्दी पल्पिंगसाठी मिलकडे तात्काळ पाठवावी व त्याचे रितसर प्रमाणपत्र या कार्यालयास १० दिवसाचे आत सादर करणे ही जबाबदारी रद्दी खरेदी दाराची राहील.

५. रद्दी खरेदीचा पुरवठा आदेश मिळताच रुपये २०,०००/- (अक्षरी वीस हजार) चा धनाकर्ष/रोख स्वरुपात अनामत रक्कम या संस्थेत ठेवणे बंधनकारक राहील.

६. सदर रद्दीची संपूर्ण किंमत या संस्थेत तात्काळ भरुन रितसर पावती घ्यावी लागेल त्याशिवाय आपणास सदर रद्दी संस्थेच्या बाहेर नेण्याची परवानगी राहणार नाही.

७. सदर संपूर्ण रद्दीचे पल्पिंग केलेले प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतरच आपली अनामत रक्कम आपणास परत करण्यात येईल.

८. सदर संपूर्ण रद्दी गोपनीय स्वरुपाची असल्यामूळे हया बाबत पुर्णतः गोपनीयता राखण्याची जबाबदारी कंत्राटदारची राहील.

९. कंत्राटदारास १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर रद्दी खरेदीच्या अटी मान्य असल्याचा करारनामा सादर करावा लागेल.

१०. कंत्राटदारांनी निवीदे सोबत दोन सिलबंद लिफाफे जोडावेत. एका लिफाफ्यात शॉप अॅक्ट लायन्सस, जीएसटी प्रमाणपत्र / पॅनकार्ड, सरकारी कार्यालये तसेच शैक्षणीक संस्था मधील रद्दी घेतल्याचे आदेश/प्रमाणपत्र व तसेच फर्म संबंधी इतर कागदपत्रे निवीदा/दरपत्रक, रद्दी पल्पिंग करणा-या कंपनीने खरेदीदारास दिलेले प्रमाणपत्र तसेच प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांच्या नावे रु.१०,०००/- (रु.दहा हजार फक्त/-) चा धनाकर्ष सोबत जोडणे बंधनकारक राहिल. तसेच दुस-या लिफाफ्यात रद्दीचे दरपत्रक देण्यात यावे. दोन्ही लिफाफे एकत्रित मोठया लिफाफ्यात सिलबंद करावे.

११. कंत्राटदारांनी आपल्या निविदा सिलबंद लिफाफयामध्ये पाठवाव्यात व त्या लिफाफयावर " रद्दी खरेदी ची निविदा" असे ठळक अक्षरात नमुद करुन दिनांक 30 /०८/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा हया ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

१२. सदर निविदा हया किमान सहा महिन वैध असाव्यात.

१३. सदर निविदाचे संपूर्ण अधिकार हे खालील स्वाक्षरी करणा-या अधिका-याकडे राहतील.

१४. उच्च्तम दर असणा-या खरेदीदारास खरेदी आदेश देण्यात येईल. खरेदीआदेश मिळाल्यानंतर दोन आठवडयांच्या आत सदरील रद्दी संस्थेतून हस्तगत करणे बंधनकारक राहिल. या कालावधी मध्ये खरेदीदाराने रद्दी हस्तगत केली नसल्यास त्यांनी निवीदे सोबत दिलेला धनाकर्ष दंड स्वरुपात जमा करण्यात येईल. तदनंतर दुस-या क्रमांकाचे उच्चतम दर असलेले खरेदीदारास रद्दी हस्तगत करण्याकरिता खरेदी आदेश देण्यात येतील. त्यानाही वरील प्रमाणेच नियम असतील, त्यांनीही सदरील रद्दी नेण्यास नकार दिल्यास तृतीय, तंदनंर चौथे, पाचवे,.. अशा प्रकारे खरेदीदारास रद्दी नेण्याकरिता व पुढील प्रक्रिया करण्याकरिता खरेदीदारास बोलवण्यात येईल.

१५. सदरील रद्दी ही शैक्षणीक स्वरुपाची असल्याकारणाने त्यांची गोपीनियता राखणे बंधनकारक राहिल.

| अ.क्र. | रद्दीचा प्रकार | शेरा |
|---|---|---|
| १ | जुन्या उत्तर पत्रिका (Answer sheet) | रद्दीचा दर हा प्रति किला प्रमाणे नमुद करण्यात यावा. |
| २ | जून्या फाईल | |
| ३ | जूने प्रोजेक्ट रिपोर्ट | |
| ४ | वर्तमान पत्र | |
| ५ | मासीके | |
| ६ | इतर रद्दी | |
| ७ | ड्रॉइंग शिट (Drawing Sheets) | |

संजय उगार

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद
छत्रपती संभाजीनगर